बसवंत गार्डन कट्टा



# कृषी व्यवसायाच्या शाश्वत विकासासाठी गाय, गांडूळ आणि मधमाशी उपयुक्त

## 'कृषिमित्र'च्या स्नेहमेळाव्यात श्री. संजय पवार यांचे प्रतिपादन



'कृषिमित्र'च्या स्नेहमेळाव्यात श्री. निवृत्ती न्याहारकर यांना 'मिथिलेश सिंह स्मृती पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. यावेळी उपस्थित श्री. संजय पवार यांच्यासह 'कृषिमित्र ग्रुप'चे सदस्य आणि अन्य मान्यवर.

**पिंपळगाव बसवंत (नाशिक) :**– गेल्या काही वर्षांपासून, कोणताही विवेक न बाळगता रासायनिक खते आणि औषधे उपयोगात आणली जात आहेत. त्यामुळे उपजाऊ जमिनीचा ऱ्हास होत असून, शेती व्यवसाय दुरवस्थेला गेला आहे. अशा परिस्थितीत आपली शेती वाचवायची असेल तर जमिनीवर गाय, जमिनीखाली गांडूळ आणि हवेत मधमाशीचे पालन–संवर्धन केले पाहिजे. ही त्रिसूत्री अंमलात आणली तरच शेती फायद्याची ठरेल, असे प्रतिपादन 'पूर्वा केमटेक' तथा 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार यांनी केले.

शेतकऱ्यांच्या विकासासाठी स्थापन झालेल्या 'कृषिमित्र ग्रुप'चा स्नेहमेळावा पिंपळगाव बसवंत (ता. निफाड, जि. नाशिक) येथील बसवंत मधमाशी उद्यानात नुकताच झाला.



बसवंत मधमाशी उद्यानातील सेल्फी पॉईंटवर 'कृषिमित्रां'ची मधमाशीशी मैत्री...

**मधमाश्यांशी मैत्री करावी...**

बेसुमार प्रमाणात वापरल्या जात असलेल्या रासायनिक कृषी निविष्ठांमुळे मधमाश्या नामशेष होत चालल्या आहेत. त्यांना वाचवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. हे लक्षात घेऊन, मधमाश्यांबद्दल समाजात असलेली भीती दूर करणे गरजेचे आहे. मधमाश्या आपल्या मित्र होऊ शकतात, हे सातत्याने समजावून सांगायला हवे, असेही श्री. संजय पवार यांनी नमूद केले.

यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना श्री. पवार बोलत होते. या कार्यक्रमात श्री. निवृत्ती न्याहारकर (रा. वाहेगाव साळ) यांना मिथिलेश सिंह यांच्या स्मरणार्थ 'कृषिमित्र पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कांदा पीक विशेषज्ञ डॉ.श्री. सतीश बोंडे होते. हवामानतज्ज्ञ श्री. माणिकराव खुळे, 'स्वप्नील ॲग्रो'चे अध्यक्ष श्री. अरुण पवार यांनी सहभागी सदस्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक दैनिक 'दिव्य मराठी'चे प्रतिनिधी श्री. सचिन वाघ यांनी केले.

यावेळी जिल्हा कृषी अधीक्षक श्री. विवेक सोनवणे, जिल्हा कृषी अधिकारी श्री. कैलास शिरसाठ, डॉ.श्री. रामनाथ जगताप, श्री. संजय सूर्यवंशी, श्री. हंसराज वडघुले, श्री. तुषार आंबरे, श्री. शंकर ढिकले, श्री. भारत दिघोळे, श्री. सदूभाऊ शेळके, श्री. अमोल गोरे, श्री. दर्शन केंगे, श्री. दीपक पगार, श्री. विनोद जाधव, श्री. वाल्मीक सांगळे, श्री. संदीप मगर, श्री. नानासाहेब पाटील, श्री. भरोसा अहिरे, श्री. विलास रोटे, श्री. योगेश रायते, श्री. पानपाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. भूषण निकम यांनी केले. ■



### सन्मानचिन्हांच्या शिल्पकारांकडून 'बसवंत गार्डन'ची प्रशंसा

श्री. चारुदत्त कुलकर्णी हे नाशिकच्या कला-सांस्कृतिक क्षेत्रातील एक आदरणीय व्यक्तिमत्त्व. आजवर हजारो स्मृतिचिन्हे, गौरवमुद्रांवर आपल्या कौशल्याची नाममुद्रा उमटविणाऱ्या श्री. कुलकर्णी साहेबांनी अलिकडेच 'बसवंत गार्डन'ला सहकुटुंब भेट दिली. कोणत्याही वयोगटातल्या पर्यटकांना तसेच विद्यार्थ्यांना निसर्गाचा निखळ अनुभव मिळवून देणाऱ्या या परिसराबद्दल त्यांनी मन:पूर्वक गौरवोद्गार काढले. मधमाशी पालन आणि स्वयंपूर्ण ग्रामजीवन यांच्या माध्यमातून साऱ्या लोकजीवनाला शाश्वत विकासाची हमी देणारे हे पर्यटनस्थळ आनंददायी असल्याचा अभिप्राय त्यांनी समक्ष तसेच समाजमाध्यमांद्वारेही आवर्जून व्यक्त केला आहे.

### नाशिकचे नवे वैभव : बसवंत मधमाशी उद्यान

मधमाश्यांच्या सहस्त्रावधी प्रजाती असतात तर कामकरी माश्या सर्वाधिक कष्टाळू असतात. नर मधमाश्यांना फारसे महत्त्व नसते तर राणीमाशी दीर्घकाळ जगते. मधमाश्या षटकोनी आकाराचीच घरे बांधतात तसेच मधमाश्या नसतील तर आपण फार काळ जगू शकणार नाही; अशा प्रकारची अगदी वेगळी माहिती बसवंत मधमाशी उद्यान बघताना मिळते. सचित्र रुपातल्या या सजीव मधुसृष्टीने बरेच काही शिकवले. बसवंत मधमाशी उद्यान हे नाशिकचे नवे वैभव आहे, असा अभिप्राय श्री. रमेश पडवळ यांनी व्यक्त केला.



'महाराष्ट्र टाईम्स'चे प्रतिनिधी श्री. रमेश पडवळ यांनी 'बसवंत गार्डन'ला नुकतीच सहकुटुंब भेट दिली. यावेळी त्यांचे स्वागत करताना प्रकल्प व्यवस्थापक श्री. संदीप वाघ.



पुणे जिल्ह्यातील निगडी परिसरातल्या ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालयातील विद्यार्थ्यांची 'बसवंत गार्डन'मधील आनंदवारी...